# University of Mumbai

परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०००९८

क्र.परीक्षा/वाणिज्य निकाल कक्ष/१८३७/२०१७

**परिपत्रक :–**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे संचालक/समन्वयक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या विद्वत परिषदेच्या दि. ३० सप्टेंबर, २०१६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये बाब क्र. ४.१२ अन्वये M.M.M., M.I.M., M.H.R.D.M., M.F.M, M.E.M. आणि M.O.M. या पदव्युत्तर शिक्षणक्रमाच्या विद्यापीठ घेत असलेल्या सत्र–४ व ५ च्या परीक्षा शैक्षणिक वर्ष २०१६–१७ पासुन त्या त्या संबंधित महाविद्यालय स्तरावर घेण्यात याव्यात असा ठराव पारित करण्यात आलेला आहे.

उपरोक्त बाब विद्यापीठ परिपत्रक क्रं.युजी/१८९/२०१६–२०१७, दिनांक ०३ डिसेंबर, २०१६ अन्वये सर्व महाविद्यालयांना/संस्थाना कळविण्यात आलेली आहे.

तरी ज्या महाविद्यालयांकडुन/संस्थाकडून एप्रिल/मे, २०१७ मध्ये होणाऱ्या उपरोक्त शिक्षणक्रमाच्या सत्र ४ व ५ च्या परीक्षांचे परीक्षा अर्ज विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडे पाठविलेले आहेत, त्यांनी हे अर्ज शक्य तितक्या लवकर म्हणजेच परिपत्रक निर्गमित झाल्यापासुन १० दिवसाच्या आत परीक्षा विभागातील संबंधित कक्षाकडुन परत घेऊन जावेत, तसेच या अर्जासाठीचे जमा केलेले परीक्षा शुल्क उपकुलसचिव, वित्त व लेखा विभाग, परीक्षा विभाग येथुन घेऊन जावे.

तरी सर्व संबंधितांनी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही विहित कालावधीत करावी ही विनंती.

(दीपक वसावे)
स्था. परीक्षा नियंत्रक

स्थळ : मुंबई.
दि. : १० जानेवारी २०१७.

अ. प्रतः–

१. मुंबई विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित असलेल्या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक तसेच विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे संचालक/समन्वयक

क. प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषितः–

उपकुलसचिव, वित्त व लेखा विभाग, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ.